# प्रकरण पाचवे

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

कोकणाला महाराष्ट्राच्या व दख्खनच्या इतिहासात प्राचीन कालखंडापासून अनन्यसाधारण महत्त्व होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कोकण किनारपट्टीवरच प्राचीन कालखंडापासून परकीयांचे सबंध येत होते. सातवहानांच्या कालखंडात रोमन साम्राज्याचे व कोकणचे संबंध प्रस्थापित झाले होते. सातव्या शतकाच्या पुढे अरब व्यापाऱ्यांचा कोकण किनारपट्टीवर प्रवेश झाल्यामुळे कोकणचे आखाती देशांशी संबंध निर्माण झाले व हे व्यापारी संबंध अगदी १७ व्या शतकापर्यंत चालू होते. कोकणात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात अनेक राजघराण्यांची सत्ता निर्माण झाली. जुन्या राजवटींचा नाश होऊन नव्या राजवटी उदयास आल्या. या सर्व कालखंडातील लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे कोकण किनारपट्टीवर त्याच प्रदेशातल्या स्थानिक सत्ता नेहमी प्रभावशाली होत राहिल्या. उदा. कल्याणीच्या चालुक्याच्या काळातील शिलाहार, हे जरी चालुक्याचे मांडलिक असले तरी कोकणात त्यांचीच सत्ता प्रबळ होती. मध्ययुगीन काळातदेखील बहामनी राजाला कोकणात आपला अंमल निर्माण करण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. मराठे काळात शिवाजी महाराजांनी आदिलशाहीला आव्हान देऊन कोकणात स्वराज्य निर्माण केले व १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात कोकणात कान्होजी आंग्रे, जंजीऱ्याचे सिद्दी, सावंतवाडीकर, मुंबईचे इंग्रज व उत्तर कोकणात पोर्तुगीज अशा सत्तांचा अंमल चालू होता. पण पेशव्यांच्या उदयाबरोबरच मराठी राज्याचा प्रभाव वाढू लागला. पहिल्या बाजीरावाच्या काळात जंजीऱ्याच्या सिद्दीला नामोहरम करण्यात आले. तर सन १७३९ मध्ये वसई काबीज

करुन उत्तर कोकणातून पोर्तुगीज सत्तेचे उच्चाटन करण्यात आले. पण याचवेळी पेशव्यांनी एक घोडचूक केली होती. ती म्हणजे इंग्रजांच्या मदतीने सन १७५६ मध्ये आंग्रेचा पाडाव केला. की ज्यामुळे इंग्रजांना कोकणात प्रतिस्पर्धी राहिला नाही.

सन १७५६ ते १८१८ या कालखंडात कोकणात सावंतवाडीकर, कोल्हापूरकर, पोर्तुगीज, पेशवे व मुंबईचे इंग्रज यांच्यामध्ये कोकणातील प्रदेश बळकावण्यासाठी सत्तास्पर्धा चाललेली होती. या सत्तास्पर्धेमध्ये या पाचही सत्ता वेळोवेळी आपल्याला अनुकूल अशा पध्दतीने बाजू बदलताना दिसतात. सावंतवाडीकरांना कोल्हापूरचे छत्रपती आपले शत्रू वाटत होते. त्यामुळे प्रसंगी पोर्तुगीजांची मदत घेऊन कोल्हापूरकरांना विरोध करण्याचा प्रयत्न सावंतवाडीकरांनी केला. याउलट कोल्हापूरकरांनी राणी जिजाबाईच्या काळात मुंबईच्या इंग्रजांशी तह करुन सावंतवाडी विरुध्द आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला होता. पण सावंतवाडीकरांची एक जमेची बाजू अशी होती की, महादजी शिंदेची पुतणी सावंतवाडीकरांच्या घराण्यात दिलेली होती. त्यामुळे महादजी शिंदे नाना फडणीसाला सावंतवाडीकरांना मदत करण्याची विनंती करीत असे. अशा प्रकारे सावंतवाडीकर विरुध्द कोल्हापूरकर व इंग्रज यांचा संघर्ष कोकणात चालू होता. कोकणात सावंतवाडीकरांचे व कोल्हापूरकरांचे आरमार भक्कम नसल्याने इंग्रजांना फारसा प्रतिकार करणे त्यांना शक्य नव्हते. परिणामतः १९ व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्रजांनी एकीकडे पेशव्यांचा पराभव केलेला होता. त्याचप्रमाणे सन १८१२ मध्ये कोल्हापूरकरांशी करार केलेला होता. सावंतवाडीकर एकाकी पडले व त्यांच्या राज्यावरदेखील अधिपत्य इंग्रजांनी सन १८१९ मध्ये प्रस्थापित केले.

उत्तर कोकणामध्ये १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात पेशव्यांची सत्ता निर्माण झाल्याने इंग्रजांचा त्यांच्याशी संघर्ष होणे अटळ होते व तशी संधी त्यांना सहजगत्या उपलब्ध झाली. राघोबा दादा जेंव्हा इंगजांच्या आश्रयास गेला व त्याने इंग्रजांबरोबर सुरतेचा तह केला तेंव्हा पेशव्यांच्या राजकारणात नाक खुपसण्याची संधी इंग्रजांना सहजच प्राप्त झाली. यातून पुढे वडगांवचा तह, वसईचा तह इ. तह करुन इंग्रजांनी साष्टी, कल्याण, ठाणे, वसई भागावर आपली अधिसत्ता निर्माण केली. सन १८०२ नंतर शिंदे, होळकर, रघूजी भोसले यांच्याशी वेगवेगळे तह करुन इंग्रजांनी पेशव्याला एकाकी पाडले आणि तिसऱ्या इंग्रज मराठा युध्दात दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव करुन कोकणसह पेशव्याच्या ताब्यातील इतर प्रदेशात आपली अधिसत्ता निर्माण केली. अशा प्रकारे उत्तर कोकणात पेशव्यांचा पाडाव करुन व दक्षिण कोकणात सावंतवाडीकरांचा पाडाव करुन इंग्रजांनी संपूर्ण कोकणावर सन १८१९ मध्ये आपला अंमल निर्माण केला.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोकण किनारपट्टीवर कांही प्रमुख बंदरे कार्यरत होती. त्यातील महत्त्वाचे बंदर मुंबई होय. मुंबई हे १७ व्या शतकात सात बेटांचा एक समूह होता. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील मुंबई शहराविषयी व मुंबईच्या व्यापाराविषयी जेम्स फोर्बस् मिलबर्न इ. तत्कालीन लेखकांनी त्यांच्या वृत्तांतामध्यें माहिती दिलेली आढळते. मुंबई बंदराला १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत विशेष व्यापारी महत्त्व नव्हते. याचे कारण म्हणजे १७ व्या शतकात व १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर सुरत या बंदराचे महत्त्व अनन्यसाधारण होते. दळणवळणाच्या दृष्टीकोनातून सुरतेचे स्थान जितके सोईस्कर होते तेवढे ते मुंबईचे नव्हते. मुंबईच्या पूर्व बाजूवर सर्व घाटमाथ्याचा भाग असल्याने

भारताच्या विविध भागातून भूमार्गाने मुंबईशी दळणवळण करणे इतके सोईस्कर नव्हते. सुरतेला जोडणारे बरेच रस्ते मुघल राज्यात होते. तसे ते मुंबईच्या बाबतीत नव्हते. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र गुजरात येथील अराजक राजकीय परिस्थतीमुळे सुरतेचे महत्त्व हळूहळू कमी झाले व मुंबईची भरभराट झाली.

मुंबईखेरीज कोकणात कल्याण, बाणकोट, वसई, चेऊल, पेण, पनवेल, रोहे, राजापूर इ. महत्त्वाची बंदरे होती. कोकणातील व्यापारामध्ये या बंदरांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण होती.

कोकणातील समाज विविध जातीजमातींमध्ये विभागलेला होता. ब्राम्हण, कुणबी, बलुतेदार आणि अस्पृश्य किंवा अतिशूद्र अशा विविध जाती कोकणात अस्तित्वात होत्या.

कोकणातील समाजाचे वैशिष्टय असे की, धर्म, अंधश्रध्दा, भूते, तंत्रमंत्र याचा फार मोठा पगडा तेथील समाजावर होता. भूते घालणे, जारणमारण करणे इ. गोष्टी पेशवेकाळात गुन्हे मानण्यात येत असत व त्यासाठी वेगवेगळया शिक्षा दिल्याची पत्रेदेखील पेशव्यांच्या रोजनिशीत सापडतात. त्याचबरोबर कोळी, भंडारी अशा दर्यावर्दी व्यक्तींचा समूहदेखील कोकणात होता. पण पश्चिम युरोपियन व्यापाऱ्यासारखी दर्यावर्दी व्यापारात या समाजाने फारशी प्रगती केली नाही. कोकणातील सर्वसामान्य व्यक्तीचे जीवन गरिबीचे व त्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती परिस्थितीने गांजलेल्या होत्या. देशावर असणारी बलुतेदारी पध्दत कोकणातदेखील चालू होती. सुतार, लोहार, कुंभार, चांभार, महार, ढोरे, मांग आपापल्या व्यवसायानुरुप गावकीच्या कामात गुंतलेले असत. पण कोकणातील समाज व देशातील लोकांचा समाज यांच्यातील एक फरक म्हणजे कोकणात गावकीचा कारभार खोत पहात असत. खोत हेच गावकरी व पेशवे सरकार

यांच्यामधील मध्यस्थ असत. कोकणाचे दुसरे एक वैशिष्ट म्हणजे कृषी व्यवस्थेत प्रचलित असणारी खोती पध्दती होय. अशा प्रकारची खोती पध्दत देशावर अस्तित्वात नव्हती. ही खोती पध्दत फक्त कोकणातच चालू होती.

कोकणात खोती पध्दतीचा वतनदार खोत हा एक प्रकार होता. त्यांची खोती सहसा काढून घेतली जात नसे. मात्र इतर खोतीची विक्री होत असे. परिणामी कोकणातील हिंदू व मुस्लिम खोतांची संख्या कमी होऊन ब्राम्हण खोतांची संख्या कोकणात वाढली. या खोतांना वेठबिगारी करुन घेण्याचा अधिकार होता. तसेच कोकणात गुलामगिरी व वेठबिगारीची पध्दती अस्तित्वात होती.

# संदर्भ साधने

## प्राथमिक साधने (प्रकाशित)


१. बेंद्रे वा. सी., महाराष्ट्र इतिहासाची साधने भा. १ ते ३ (१७५१ ते १८८०) मुंबई, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, ऑक्टोबर १९६७

२. देसाई एस्. एस्. (संपा) मराठयांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर खंड १ ते ३, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९६८

३. गर्गे एस्. एम्., करवीर रियासतीची कागदपत्रे, भाग. १,२,३, पुणे, १९६२, १९६५

४. गर्गे एस्. एम्., करवीर रियासतीची कागदपत्रे, भाग. ४, पुणे, १९८२

५. गुजर एम्. व्ही.,(संपा) करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, १ ते ८, पुणे, गुजर एम्. व्ही., १९६२, १९६५

६. खरे व्ही. व्ही., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग. ९, पुणे, आर्यभूषण छापखाना, १९१६

७. डॉ. खोबरेकर व्ही. जी. आणि शिंदे बी. एस्. (संपा) कोकणच्या इतिहासाची साधने, मुंबई, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, १९७१

८. कॅरे ॲबे -दी ट्रॅव्हल ऑफ दी ॲबे कॅरे इन इंडिया अँड नियर दी ईस्ट (१६७२-७४) संपा, फॉसेट, लंडन १९७४-७८

९. चोक्सी आर. डी., मालवण रेसिडेन्सी (१८१२-१८१९) पुणा, १९५६

१०. एल्फिन्स्टन, ए रिपोर्ट ऑन दी टेरीटरीज कॉंकर्ड फ्रॉम पेशवा, बॉंबे गव्हर्नमेंट, १८३८

११. फोर्बस् जेम्स, ओरिएंटल मेमॉयर्स, लंडन, १९३४

१२. आवळसेकर शा. वि.,

आंग्रेकालीन अष्टांगर, भा. इ. सं. मं. १९४७

ऐतिहासिक साधने, महाराष्ट्र शासन, १९६०

ऐतिहासिक संकीर्ण साधने, भा. इ. सं. मं., १९५६

कोकणच्या इतिहासाची साधने, (शिवचरित्र साहित्य, खंड ९ व १०) भा. इ. सं. मं., १९५७

१३. राजवाडे व्ही. के., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १,२,३,८,१०,१२ इ.स. १९०७ ते १९१७

१४. वाड ग. चि., पारसनीस - सिलेक्शन फ्रॉम सातारा राजाज ॲण्ड पेशवाज डायरी, ९ खंड, पुणे १९०६-१९११

१५. ओतुरकर रा. वि. (संपा) पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (१७२२-१८५४), पुणे, १९५०

१६. सरदेसाई जी. एस्. (संपा) सिलेक्शन फ्रॉम दी पेशवा दप्तर, ४५ खंड, बॉंबे गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, १९३४

१७. शिरोडकर पी. पी.(संपा) कोल्हापूर पोर्तुगीज संबंध, कोल्हापूर, १९७९

## दुय्यम साधने


१. पिंगुळकर व्ही. पी., सावंतवाडी संस्थानाचा इतिहास, सावंतवाडी, १९११

२. पिसुर्लेकर पी. एस्., पोर्तुगीज मराठे संबंध, पुणे, पुणे युनिव्हर्सिटी, १९६७

३. भावे व्ही. के., पेशवेकालीन महाराष्ट्र, नवी दिल्ली, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, १९७६

४. गर्गे एस्. एम्., करवीर रियासत, पुणे, राणे जी. वाय्., १९६८

५. डॉ. खोबरेकर व्ही. जी., महाराष्ट्रातील दप्तरखाने, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९६८

६. पारसनीस द. ब., ब्रम्हेद्रस्वामींचे चरित्र, १९००

७. चापेकर ना.गो., बदलापूर,पेशवाईच्या सावलीत, पुणे

८. आत्रे त्रि. ना., गावगाडा, ह. वि. मोटे प्रकाशन, १९५९

९. जोशी शं. ना., मराठेकालीन समाजदर्शन

१०. बेहरे पु. रा., श्री रवळनाथ आणि कोकणातील देवस्की

११. कर्वे इरावती, महाराष्ट्र लँड अँड इटस् पीपल

१२. घुर्ये, कास्ट अँड क्लास इन इंडिया, बाँबे, १९५०

१३. कुलकर्णी ए. आर., महाराष्ट्र इन दी एज ऑफ शिवाजी, पुणे १९६७

१४. देसाई सुधा, सोशल लाईफ इन महाराष्ट्र अंडर द पेशवाज, बाँबे, १९८०

१५. याजदानी, जी. डी, अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन, व्हॉ. १, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९६०

१६. अँद्रे विंक्स, लँड अँड सॉव्हरेंटी इन इंडिया, ऑक्सफोर्ड, १९८६

१७. शेनोलीकर/देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती, जडण-घडण-विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७२

१८. शेरवानी/पी.एम. जोशी, हिस्ट्री ऑफ मेडिवल डेक्कन (सन १२९५ ते १७२४) व्हॉ. १, पब्लीशड् अंडर दी ऑथॉरिटी ऑफ दी गव्हर्नमेंट ऑफ आंध्रप्रदेश

१९. पानसे एम्. जी., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, १९६३

२०. स. मा. गर्गे, करवीर रियासत, १७१० ते १८८३, गो. य. राणे प्रकाशन, पुणे, ९, दु. आवृत्ती, १९८०

२१. शा. वि. आवळसकर, नागाव, आर्थिक व सामाजिक जीवन, १७६० ते १८४०, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४, मराठी प्रकाशन ८ वे, १९६२, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

२२. मडगावंकर गो. ना., मुंबईचे वर्णन, ह. आ. भावे 'वरदा' से. बापट मार्ग, पुणे १६, १९९२

२३. मुखर्जी राधाकमल, इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, १६०० ते १८००, अलाहाबाद, १९६७

२४. नाईटेंगल पमेला, ट्रेड अँड एम्पायर इन वेस्टर्न इंडिया, १७८४-१८०७, केंब्रीज, १९७०

२५. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा) मराठयांचा इतिहास, खंड २,३

२६. मिलबर्न डब्ल्यू., ओरिएंटल कॉमर्स, व्हा. २, १८१३

२७. डिसिल्व्हा(रजिन) वसईतील ख्रिस्ती धर्म व मंदीरे, जीवनदर्शन प्रकाशन, वसई, १९७७

२८. खोबरेकर, कोकणचा राजकीय इतिहास, (इ.स. पूर्व ते १८२०), भारतीय संशोधन मंडळ, दादर, मुंबई, १९७७

**त्रैमासिके**

१. भारतीय इतिहास संस्कृती मंडळ, पुणे (संपा)

**गॅझेटिअर्स**

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, रायगड जिल्हा, संपा. डॉ. कि. का. चौधरी

२. दी गॅझेटिअर ऑफ बाँबे सिटी अँड आर्यलंड, व्हा. १,२ (१९०९)

३. दी गॅझेटिअर ऑफ बाँबे प्रेसिडेन्सी, व्हा. १३, ठाणा

४. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, कुलाबा डिस्ट्रीक्ट, व्हा. ११, १८८३

५. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, रत्नागिरी डिस्ट्रीक्ट, व्हा. १०, १९८०